# बावनश्लोकी गुरुचरित्र



प्रकाशक–बा. ल. पाठक बुकसेलर, मोतीबाजार, मुंबई २

अथ

# बावनश्लोकी गुरुचरित्र



श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमद्दत्तात्रेयगुरवे नमः ।
अथ ध्यानम् ॥ श्लोकः ॥ दिगंबरं भस्मसुगंधलेपनं
चक्रं त्रिशूलं डमरुं गदांच ॥पद्मासनस्थं रविसोमनेत्रं
दत्तात्रयं ध्यानमभीष्टसिद्धिदम् ॥ १॥ काषायवस्त्रं
करदंडधारिणं कमंडलुं पद्मकरेण शंखम् ॥ चक्रं
गदाभूषितभूषणाढ्यं श्रीपादराजं शरणं प्रपद्ये॥२॥
कृते जनार्दनो देवस्त्रेतायां रघुनंदनः ॥ द्वापारे राम-
कृष्णौ च कलौ श्रीपादवल्लभः ॥ ३ ॥ ॐनमोजी
विघ्नहरा ॥ गजानना गिरिजाकुमरा ॥ जयजयाजी
लंबोदरा ॥ एकदंता शूर्पकर्णा ॥ १ ॥ श्लोक ॥
त्रिमूर्तिराजा गुरु तूंचि माझा ॥ कृष्णातिरीं वास
करूनि ओजा ॥ सद्भक्त तेथें करिती आनंदा ॥
त्या देव स्वर्गीं बघती विनोदा ॥ २ ॥ जयजयाजी

www.jkbhakti.in Guruitra

सिद्धमुनी ॥ तूं तारक भवार्णवांतुन ॥ संदेह होता
माझे मनीं ॥ आजि तुवां कुडें केलें ॥ ३ ॥ ऐशी
शिष्याची विनंती ॥ ऐकूनि सिद्ध काय बोलती ॥
साधु साधु तुझी भक्ति ॥ प्रीती पावो श्रीगुरुचरणीं
॥४॥ भक्तजनरक्षणार्थ ॥ अवतरला श्रीगुरुनाथ ॥
सगरपुत्रांकारणें भगीरथें ॥ गंगा आणिली भूमं-
डळीं ॥ ५ ॥ तीर्थें असतीं अपार परी ॥ समस्त
सांडूनि प्रीति करी ॥ कैसा पावला श्रीदत्तात्री ॥
श्रीपादश्रीवल्लभ ॥ ६ ॥ ज्यावरी असे श्रीगुरुची
प्रीती ॥ तीर्थमहिमा ऐकावया चित्तीं ॥ वांछा
होतसे त्या ज्ञानज्योती ॥ कृपामूर्ति यतिराया ॥७॥
गोकर्णक्षेत्रीं श्रीपादयती ॥ राहिले तीन वर्षें गुप्ती ॥
तेथूनि गुरु गिरिपुरा येती ॥ लोकानुग्रहाकारणें ॥८॥
श्रीपाद कुरवपुरीं असतां ॥ पुढें वर्तली कैशी कथा ॥
विस्तारूनि सांग आतां ॥ कृपामूर्ति दातारा ॥ ९ ॥
सिद्ध म्हणे नामधारकासी ॥ श्रीगुरुमहिमा काय
पुससी ॥ अनंतरूपें परियेसी ॥ विश्वव्यापक पर-

www.jkbhakti.in

मात्मा ॥ १० ॥ सिद्ध म्हणे ऐक वत्सा ॥ अवतार झाला श्रीपादहर्षा ॥ पूर्ववृत्तांत ऐकिला ऐसा ॥ कथा सांगितली विप्रस्त्रियेची ॥ ११ ॥ श्रीगुरु म्हणती जननीसी ॥ आम्हां ऐसा निरोप देसी ॥ अनित्य शरीर तूं जाणसी ॥ काय भरंवसा जीविताचा ॥ १२ ॥ श्रीगुरुचरित्र कथामृत ॥ सेवितां वांछा अधिक होत ॥ शमन करणार समर्थ ॥ तूंचि एक कृपासिंधु ॥ १३ ॥ ऐकूनि शिष्याचें वचन ॥ संतोष करी सिद्ध आपण ॥ श्रीगुरुचरित्र कामधेनू जाण ॥ सांगता झाला विस्तारें ॥ १४ ॥ ऐक शिष्या शिरोमणी ॥ धन्य धन्य तुझी वाणी ॥ तुझी भक्ति श्रीगुरुचरणीं ॥ लीन झाली परियेसी ॥ १५ ॥ विनवी शिष्य नामांकित ॥ सिद्ध योगियातें पुसत ॥ सांगा स्वामि वृत्तांत ॥ श्रीगुरुचरित्र विस्तारें ॥ १६ ॥ ऐक शिष्या नामकरणी ॥ श्रीगुरुभक्त शिखामणि ॥ तुझी भक्ति श्रीगुरुचरणीं ॥ लीन झाली निर्धारें ॥ १७ ॥ ध्यान लागलें श्रीगुरुचरणीं ॥ तृप्ति नोहे अंतः-



www.jkbhakti.in

करणीं ॥ कथामृत संजीवनी ॥ आणिक निरोपावी दातारा ॥१८॥ अज्ञान तिमिर रजनींत ॥ निजलों होतों मदोन्मत्त ॥ श्रीगुरुचरित्र वचनामृत ॥ प्राशन केलें दातारा ॥१९॥ स्वामी निरोपिलें आम्हांसीं ॥ श्रीगुरु आले गाणगापुरासी ॥ गौप्यरूपें अमरपुरासी ॥ औदुंबरीं असती जाण ॥२०॥ सिद्ध म्हणे नामधारका ॥ ब्रह्मचारी कारणिका ॥ उपदेशीं ज्ञान विवेका ॥ तये प्रेतजननीसी ॥२१॥ तुझा चरणसंपर्क होतां ॥ झालें ज्ञान मज आतां ॥ परमार्थीं मन ऐकतां ॥ झालें तुझे प्रसादें ॥२२॥ लोटांगणें श्रीगुरुसी ॥ जाऊनि राजा भक्तीसीं ॥ नमस्कारी विनयेंसी ॥ एकभावें करूनियां ॥२३॥ शिष्यवचन परिसुनी ॥ सांगतां झाला सिद्धमुनी ॥ ऐक भक्ता नामकरणी ॥ श्रीगुरुचरित्र अभिनव ॥२४॥ सिद्ध म्हणे ऐक बाळा ॥ श्रीगुरुची अगम्य लीला ॥ सांगतां न सरे बहुकाळा ॥ साधारण मी सांगतसें ॥२५॥ श्रीगुरु म्हणती

www.jkbhakti.in

ब्राह्मणासी ॥ नको भ्रमूरें युक्तीसी ॥ वेदांत न कळे ब्रह्मयासी ॥ अनंत वेद असती जाण ॥ २६ ॥ चतुर्वेद विस्तारेंसीं ॥ श्रीगुरु सांगती विप्रासी ॥ पुढे कथा वर्तली कैसी॥विस्तारावी दातारा ॥२७॥ नामधारक म्हणे सिद्धासी ॥ पुढील कथा सांगा आम्हांसी ॥ उल्हास होतो माझे मानसीं ॥ श्रीगुरु-चरित्र अतिगोड ॥ २८ ॥ पुढें कथा कवणेपरी ॥ झाली असे गुरुचरित्रीं ॥ निरूपावें विस्तारीं ॥ सिद्धमुनी कृपासिंधू ॥ २९ ॥ श्रीगुरुचरित्र सुधा-रस ॥ तुम्ही पाजिला आम्हांस ॥ परी तृप्त नव्हे गा मानस ॥ तृषा आणिक होतसे ॥ ३० ॥ सिद्ध म्हणे नामधारका ॥ पुढें अपूर्व झालें ऐका ॥ योगेश्वर कारणिका ॥ सांगे स्त्रियांचे स्वधर्म ॥ ३१ ॥ पति-व्रतेची रीती ॥ सांगे देवांसी बृहस्पती ॥ सहगम-नाची फलश्रुती ॥ येणेंपरी निरूपिली ॥ ३२ ॥ श्रीगुरु आले मठासी ॥ पुढें कथा वर्तली कैसी ॥ विस्तारूनि आम्हांसी॥निरूपावें स्वामिया ॥३३॥

www.jkbhakti.in

श्रीगुरु म्हणती दंपतीसी ॥ ऐका पाराशरऋषि ॥
तया काश्मीररायासी ॥ रुद्राक्षमहिमा निरूपिला
॥३४॥ पुढें कथा कैसी वर्तली ॥ विस्तारूनि सांगा
वहिली ॥ मति असे माझी वेधिली ॥ श्रीगुरुचरित्र
ऐकावया ॥ ३५ ॥ गाणगापुरीं असतां श्रीगुरु ॥
महिमा झाला अपरंपारू ॥ सांगतां नये विस्तारू ॥
तावन्मात्र सांगतसें ॥ ३६ ॥ ऐसा श्रीगुरु दातारू ॥
भक्तजनां कल्पतरू ॥ सांगता झाला आचारू ॥
कृपा करूनि विप्रांसी ॥ ३७ ॥ आर्त झालों मी
तृषेचा ॥ घोट भरवीं गा अमृतचा ॥ चरित्रभाग
सांगें श्रीगुरुचा ॥ माझें मन निववीं वेगीं ॥ ३८ ॥
सिद्ध म्हणे नामधारका ॥ पुढें अपूर्व झालें ऐका ॥
साठ वर्षें वांझ देखा ॥ पुत्रकन्या प्रसवली ॥ ३९ ॥
सिद्ध म्हणे नामधारका ॥ अपूर्व वर्तलें आणिक
ऐका ॥ वृक्षा झाला काष्ठ सुका ॥ विचित्र कथा
परियेसा ॥ ४० ॥ जयजयाजी सिद्धमुनी ॥ तूं
तारक या भवार्णवांतुनी ॥ नानाधर्म विस्तारूनि ॥

www.jkbhakti.in

श्रीगुरुचरित्र निरूपिलें ॥ ४१ ॥ मागें कथानक
निरूपिलें ॥ सायंदेव शिष्य भले ॥ श्रीगुरूंनीं
त्यांसी निरूपिलें ॥ कलत्र पुत्र आणीं म्हणती
॥ ४२ ॥ श्रीगुरु म्हणती द्विजांसी ॥ या अनंत
व्रतासी ॥ सांगेन ऐका तुम्हांसी ॥ पूर्वीं बहुतीं
आराधिलें ॥ ४३ ॥ श्रीगुरु माझा मल्लिकार्जुन ॥
पर्वत म्हणजे श्रीगुरुभुवन ॥ आपण नयें आतां
येथून ॥ सोडूनि चरण श्रीगुरुचे ॥ ४४ ॥ तूं
भेटलासी मज तारक ॥ दैन्य गेलें सकळहि दुःख ॥
सर्वाभीष्ट लाधलें सुख ॥ श्रीगुरुचरित्र ऐकतां ॥
॥ ४५ ॥ गाणगापुरीं असतां श्रीगुरु ॥ ख्याती
झाली अपारू ॥ लोक येती थोरथोरू ॥ भक्त बहुत
झाले असती ॥ ४६ ॥ सांगेन ऐका कथा विचित्र ॥
जेणें होय पतित पवित्र ॥ ऐसें हें गुरुचरित्र ॥
तत्परतेसीं परियेसा ॥ ४७ ॥ श्रीगुरु नित्य संग-
मासी ॥ जात होते अनुष्ठानासी ॥ मार्गांत शुद्र
परियेसी ॥ शेतीं आपुल्या उभा असे ॥ ४८ ॥

www.jkbhakti.in

त्रिमूर्तींचा अवतार ॥ वेषधारी झाला नर ॥ राहिले प्रीतीं गाणगापुर ॥ कवण क्षेत्र म्हणूनियां ॥ ४९ ॥ तेणें मागितला वर ॥ राज्यपद धुरंधर ॥ प्रसन्न झाला त्यासी गुरुवर ॥ दिधला वर परियेसा ॥५०॥ रामभेटी घेउनी ॥ श्रीपाद आले गाणगाभुवनीं ॥ योजना करिती आपुले मनीं ॥ गौप्य रहावें म्हणूनियां ॥ ५१ ॥ म्हणे सरस्वती गंगाधर ॥ श्रोतयां करी नमस्कार ॥ कथा ऐका मनोहर ॥ सकळाभीष्ट लाधेल ॥ ५२ ॥ इति श्रीगुरुचरित्रकथाकल्पतरौ सिद्धनामधारकसंवादे द्विपंचायतश्लोकात्मकं गुरुचरित्रं संपूर्णम् ॥

---

Downloaded from www.jkbhakti.in

www.jkbhakti.in